# प्रेसनोट

दि. १६/०१/२०२५

**ॲन्टी करप्शनच्या पुणे घटकाकडून तालुका पंचायत समिती माळशिरस, जि. सोलापूर येथील कनिष्ठ अभियंता याचेवर लाच मागणी व लाच स्विकारले प्रकरणी कारवाई.**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | माळशिरस पोलीस स्टेशन, सोलापूर ग्रामीण |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७ अन्वये. |
| तक्रारदार | पुरुष, वय ३७ वर्ष |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | शशिकांत सयाजी चौगुले, पद – कनिष्ठ अभियंता, तालुका पंचायत समिती, माळशिरस, जि. सोलापूर. (वर्ग-३) |
| सुरवातीला लाच मागणी रक्कम | ६७,०००/- रुपये |
| पडताळणी दरम्यान लाच मागणी | १,००,०००/- रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ५०,०००/- (पन्नास हजार) रुपये |
| पडताळणी दिनांक | १६/०१/२०२५ |
| सापळा दिनांक व ठिकाण | १६/०१/२०२५ रोजी तालुका पंचायत समिती कार्यालयात, माळशिरस, जि. सोलापूर. |
| तपास अधिकारी यांचे नाव व पद | श्री. गणेश कुंभार, पोलीस उपअधीक्षक, लाप्रवि, सोलापूर (मो.क्र. ९७६४१५३९९९) |

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांच्या पत्नीच्या नावे शासकिय इलेक्ट्रिकल कामे करण्यासाठीचा शासकीय परवाना असून, त्यासाठी त्यांनी एक फर्म स्थापन केली आहे. या फर्मद्वारे स्थानिक स्वराज्य संस्थेअंतर्गत येणारी सर्व प्रकारची इलेक्ट्रिक कामे करण्यात येत असतात. या फर्मला मिळणारी शासकीय इलेक्ट्रिक कामे करण्यासाठी तरोच केलेल्या कामाच्या बिलासाठीचा पाठपुरावा करण्यासाठी तक्रारदाराच्या पत्नीने तक्रारदाराला अधिकारपत्र दिलेले आहे.

तक्रारदाराने फर्मच्या वतीने फळवणी ग्रामपंचायत, ता. माळशिरस, जि. सोलापूर येथे शासकिय इलेक्ट्रीक काम पुर्ण केलेले आहे. त्याबाबतचे बिल त्यांना मिळाले आहे. तसेच त्यांनी पिलीव ग्रामपंचायत अंतर्गत केलेल्या रोडलाईटच्या कामाच्या बिलाच्या अनुषंगाने पाठपुरावा करत असताना तक्रारदार हे यातील लोकसेवक शशिकांत चौगुले, कनिष्ठ अभियंता यांचेकडे गेले असता त्यांनी तक्रारदाराकडे फळवणी ग्रामपंचायत अंतर्गत केलेल्या कामाचे बिल मिळवून देण्यासाठी केलेल्या मदतीच्या मोबदल्यात ३४,०००/- रुपये व पिलीव ग्रामपंचायत हद्दीत केलेल्या कामाच्या बिलासाठी करत असलेल्या मदतीच्या मोबदल्यात ३३,०००/- रुपये असे एकूण ६७,०००/- रुपये लाचेची मागणी केल्याची तक्रार तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथे दिली आहे.

सदर तक्रारदार यांच्या प्राप्त तक्रारीची पंचासमक्ष पडताळणी केली असता, लोकसेवक शशिकांत चौगुले यांनी तक्रारदार यांनी केलेल्या दोन ग्रामपंचायतीच्या हद्दीत केलेल्या इलेक्ट्रिकल कामाचे बील मंजुरीसाठी केलेल्या मदतीच्या मोबदल्यात तसेच तक्रारदाराने इतरत्र केलेल्या कामाचे बील भविष्यात मिळवून देण्यासाठी तक्रारदाराकडे १,००,०००/- रुपयांच्या लाचेची मागणी करून, आज रोजी लोकसेवक शशिकांत चौगुले यांनी तक्रारदार यांचेकडून एकुण लाच मागणी रकमेपैकी ५०,०००/- (पन्नास हजार) रुपये पंचायत समिती कार्यालय, माळशिरस, जि. सोलापूर याठिकाणी स्विकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले असून, लोकसेवक शशिकांत चौगुले यांचेविरुद्ध माळशिरस पोलीस स्टेशन, सोलापूर येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक डॉ. शितल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
२) व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
३) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
४) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
५) ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

16/1/25

(दयानंद गावडे)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक, (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.